# बोलीभाषांचा परिचय

## बोलीभाषेचा अभ्यास

मुख्य भाषा हे भाषेचे लेखनरूप सर्वमान्य व शासनाने प्रमाणित केलेले असते. राज्यकारभार, ज्ञानदान, पत्रव्यवहार यांसारख्या गरजांपोटी प्रमाणभाषेचा वापर केला जातो. मुख्य भाषेचे प्रदेशानुसार जे पोटभेद दिसतात त्यांना आपण बोली असे म्हणतो. दैनंदिन जीवनातील व्यवहारांसाठी बोलींचाच वापर प्राधान्याने केला जातो. खरे तर सर्वत्र बोलीचाच वापर होत असतो; पण लेखनव्यवहार मात्र प्रमाणभाषेतून केला जातो. उच्चार व लेखन यांत मूलत: फरक असल्यामुळे उच्चाराबरहुकूम लिहिता येतेच असे नाही. लेखन हे प्रमाणित केलेल्या लेखनरूपांनुसार म्हणजेच लेखननियमांनुसार लिहावे लागते.

वेगवेगळ्या प्रदेशांवर वेगवेगळ्या बोलींचा कमीअधिक प्रभाव जाणवतो. महानगरासारखे प्रदेश विचारात घेतल्यास तेथेही प्रमाणभाषा शुद्ध स्वरूपात बोलली जाते असे नाही, तर उच्चभ्रूंची वस्ती, मध्यमवर्गीयांची वस्ती, झोपडपट्ट्या येथे बोलीची भिन्न भिन्न रूपे आढळतात. महानगरे सोडून ग्रामीण भागाकडे गेल्यास प्रमाणभाषेपेक्षा बोलीचे प्राबल्य अधिक जाणवते.

'एखाद्या विशिष्ट लोकसमुदायातील किंवा भौगोलिक प्रदेशातील व्यक्तींच्या अंगवळणी पडलेले आणि त्यामुळे प्राय: मुद्दाम शिकावे न लागणारे व विचारांची देवाण-घेवाण करण्यासाठी सहजगत्या उपयोगी पडणारे ध्वनिरूप साधन म्हणजे बोली' अशी बोलीची व्याख्या प्रसिद्ध ध्वनिशास्त्रज्ञ ना. गो. कालेलकर यांनी केली आहे.

आधुनिक काळात भाषेच्या अभ्यासामुळे बोलींकडे पाहण्याचा दृष्टिकोन बदलला आहे. पूर्वी बोली या अशुद्ध, कनिष्ठ मानल्या जात असत; परंतु आज बोलीभाषा भाषेला समृद्ध करतात, असा विचार पुढे आलेला आहे. त्यामुळे बोलींकडे पाहण्याचा दृष्टिकोन स्वागतशील असायला हवा. निरनिराळ्या बोलींतून आज मोठ्या प्रमाणात साहित्यनिर्मिती होत असलेली दिसते. बोलीच्या अभ्यासातून विद्यार्थ्यांच्या मनांत बोलीविषयी आत्मीयता वाढावी, बोलीची उपयुक्तता कळावी यासाठी बोलीभाषांचा परिचय या विभागाचा समावेश करण्यात आलेला आहे.

प्रस्तुत विभागात मराठीच्या विविध बोलींचा परिचय व्हावा यासाठी चंदगडी, वऱ्हाडी, हळबी व बंजारा या चार बोलींतील उतारे देऊन त्यांचे मराठी भाषेत भाषांतर केले आहे. प्रत्येक बोलीत शब्दसंग्रह, वाक्यरचना, म्हणी इत्यादी बाबतीत वेगवेगळे स्वरूप जाणवते.

# १. चंदगडी बोली

चंदगड हा महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील कोल्हापूर जिल्ह्यातील एक डोंगराळ तालुका आहे. हा तालुका कर्नाटकातील बेळगावच्या पश्चिमेला १५ किमी अंतरावर आहे. पूर्वेला कर्नाटक राज्य, पश्चिमेला सिंधुदुर्ग जिल्हा, दक्षिणेला गोवा राज्य असे या परिसराचे भौगोलिक स्थान आहे. या परिसरामध्ये ही चंदगडी बोली बोलली जाते. या बोलीवर कोकणी व कन्नड या दोन भाषांचा प्रभाव आहे. चंदगड परिसरातील विस्तृत भूमीवर या बोलीची दोन रूपे दिसून येतात. या परिसराच्या पश्चिम विभागातील बोलीरूपावर कन्नडचा प्रभाव आहे, तर पूर्वेकडील बोलीरूपावर कोकणीचा प्रभाव आहे.

या बोलीभाषेत व्हत्ता, आल्ली, काडूलावत, यतलं, जातलं, यल्ली, गेल्ली अशी क्रियापदाची रूपे दिसतात. विभक्तीच्या द्वितीयेच्या प्रत्ययांच्या स, ला, ते या प्रत्ययांमध्ये स, ला ऐवजी 'स' हा प्रत्यय सर्वाधिक वापरला जातो. ही बोली उच्चारणदृष्ट्या वैशिष्ट्यपूर्ण असून विशिष्ट हेल काढून बोलणे हे या बोलीचे वैशिष्ट्य आहे.

## चंदगडी बोली नमुना

सुंदराक्काचं नी लहू गावड्याच्या कमळीचं कशावनं त् दांडगं भांडान पेटलं. देवचारागत यकीमकीच्या झिंझ्या उसपित, वरबडून घित. नव्हे नव्हे तसल्या गाळ्या दून घित. सुंदराक्काचा आप्पा मदी पडोस बगी त्यास हिंगलून घिनात. खलीबी आयकोन घेस तयार न्हाय. आमची म्हातारी न्हंगड्यास पडली. आदिच तिस कानेर सन व्हन्नाय. धुंबड आयकोन तिबी कनेत कनेत भाइर यली. 'कशास ह्या सक्कळी सक्कळी व्हयमालोलल्यात. कव्वम्हेरेनआयकोललोय ताँड बंद न्हाय दोघींचबी. डोचकं उटिवल्यानी माझं. आदिच किरम्यान डोचकं धरलय. त्यात ह्यंची हाऊळ. त्या सुंदरीस तरी सांग न पारबती जरा, त्या व्हयमालीच्या तोंडास कशा लालीसाय म्हणून'. अशी म्हणीतूच म्हातारी पडवीत गेली आणि खाटीवर पडोन भाइरली हाऊळ आयकेत पडली. मीबी चूलीडे यलो. दोन तुकडे कसेतरी खालो, डालग्याबुडल्या कोंबड्या बुट्टीत घाटलो नी मी बाज्याराच्या वाटेस लालो.

**शब्दार्थ :**

| | |
|---|---|
| **उसपित** | उपटणे |
| **कनेत कनेत** | कण्हत कण्हत |
| **कानेर** | आवाज |

| | |
|---|---|
| **किरमं** | सर्दी |
| **गाळी** | शिवी |
| **घेसू** | घ्यायला |
| **डालगे** | कोंबड्या झाकून ठेवायची बुट्टी (टोपली) |
| **दांडगं** | मोठ्ठं, मजबूत |
| **देवचार** | गावसीमेवरच्या राक्षसी देवता |
| **धुंबड** | दंगा |
| **न्हंगडं** | आजारपण |
| **व्हयमाली** | बेशरम |
| **सन** | सहन |
| **हाऊळ** | आवाज |
| **हिंगलणे** | जुमानणे |

**कृ.१. वरील बोलीभाषेतील उताऱ्याच्या आधारे खालील कृती सोडवा.**

अ. **बोलीभाषेविषयी माहिती**

**१.बोलीचा प्रकार**

**२.येथे बोलली जाते**

**३.पश्चिम विभागातील प्रभाव**

**४.पूर्व विभागातील प्रभाव**

**उत्तर:** १. चंदगडी

२. महाराष्ट्राच्या दक्षिणेकडील कोल्हापूर जिल्ह्यातील चंदगड तालुक्यात.

३. कन्नड भाषेचा.

४. कोकणी भाषेचा.

ब.

**व्याकरणिक वैशिष्ट्ये**

१. या बोलीभाषेत आढळणारी क्रियापदाची रूपे

२. विभक्तीच्या द्वितीयेच्या प्रत्ययांपैकी या प्रत्ययाचा सर्वाधिक वापर होतो?

३. उच्चारणदृष्ट्या वैशिष्ट्य

४. प्रमाणभाषेत अर्थ लिहा.
कानेर:
देवचार:

**उत्तर:** १. व्हत्ता, आल्ली, काडूलावत, यतलं, जातलं, यल्ली, गेल्ली इ.

२. 'स' प्रत्ययाचा सर्वाधिक वापर होतो.

३. विशिष्ट हेल काढून बोलणे.

४. कानेर : आवाज, देवचार : गावसीमेवरच्या राक्षसी देवता.

## किंवा

**कृ.१. वरील उताऱ्याचे प्रमाणभाषेत भाषांतर करा.**

**उत्तर:** सुंदरा आक्काचे आणि लहू गावडेंच्या कमळीचे कोणत्यातरी कारणावरून मोठे भांडण सुरू झाले. त्या राक्षसींसारख्या एकमेकींच्या झिंज्या उपटीत ओरबाडत होत्या. वाईट वाईट शिव्या देत होत्या. सुंदरा आक्काचा आप्पा या दोघींची समजूत घालण्याचा प्रयत्न करत होता; पण त्या दोघीही त्याला जुमानत नव्हत्या. कोणीही ऐकून घेण्यास तयार नव्हते. आमची म्हातारी आजारी होती. आधीच तिला आरडाओरडा सहन होत नव्हता. गोंधळ ऐकून तीसुद्धा कण्हतकण्हत बाहेर आली. 'कशाला गं बेशरम्यांनो, सकाळी सकाळी नाचता आहात. कधीपासून ऐकतेय, तोंड बंद नाही. डोके भणभणून गेले. अगोदरच सर्दीने डोके धरले आहे. त्यात यांचा दंगा. त्या सुंदरीला तरी सांग पार्वती जरा, त्या बेशरम बाईशी का भांडत बसलीस, असे म्हणत म्हातारी खोलीत गेली आणि बाहेरचा गोंधळ ऐकत खाटेवर पडून राहिली. मीसुद्धा जेवणाच्या खोलीत आलो. दोन घास कसेतरी खाल्ले, डालग्याखालच्या कोंबड्या टोपलीत घेतल्या आणि बाजाराच्या वाटेला लागलो.

# २. हळबी बोली

महाराष्ट्रातील चंद्रपूर, भंडारा तसेच एलिचपूरचा प्रदेश आणि मध्य प्रदेशातील बस्तर, कांकेर, रायपूर या भागात हळबी बोली प्रचलित आहे. या बोलीत छत्तीसगडी हिंदी आणि उडिया या भाषांचे मिश्रण आढळते. 'अ' वर्णाऐवजी आ आणि 'ऐ' बद्दल 'उइ' असे वर्ण येतात. 'व' वर्णाचा 'ब' होणे ही हिंदीभाषेची लकब येथे दिसते.

## हळबी बोली नमुना

### उडाऊ बेटा चो कहनी

कोनी मनुख चो दुइझान बेटा रहत आरु हुन दुनों में नानी बेटा आपलो बाप के बल्लो, "बूबा, जितरो धनमाल मोचो बाटा ने पडेसे हुनके मके देऊन देस." आरु हुन मनुख आपलो धनमाल के आपलो दुनों बेटा के बाटुन दिलो. जुगे दिन नी जाऊ जाऊ नानी बेटा आपलो मालमत्ता के सकलुन भाती जमाय के धरून दूसर लाफी राज में गेलो आरू हुता फोकाहार में आपलो मालमत्ता के सारुन दिलो. आरु जेबे जमाय के सारुन दिलो तेबे हुन राज में बडे अंकाल (भुकई) पडली आरु खातो काजे हुन डंड पाउक मुरयालो. तेबे हुन राजचो गोटक बीता लगे हुन गेलो, (तेबे) हुन बीता एके आपलो बेडा में घुसरा चराउक पठालो. नी रलो पाहार घुसरा के खाउक दिलो कोंडा के बले खाउन हुन आपलो पेट भरतो, मान्तर हुनी बले कोऊ मनुख हुनके नी द्रिलो. तेबे हुनके सुरता इली आरु हुन

उआटलो, "मोचो बूबा चो कितरो कमेयामन आसत आरु हुनमन लगे बले पेट भर खाउक आसे, मांतर मैं एथा भूके मरेंसे. मैं उठेंदे आरु बुवा लगे जायंदे आरु हुनके बलेंदे, 'बूवा, भगवान लगले आरु तुचो पुरे मैं पाप करलेसे आरु एबे मैं तुचो बेटा बलतो असन नी होले. मके आपलो गोटक कमेया असन राख."

**शब्दार्थ :**

| | |
|---|---|
| **अंकाल** | दुष्काळ |
| **आरु** | आणि |
| **कमेया** | नोकर |
| **घुसरा** | डुक्कर |
| **दुईझान** | दोघे जण |
| **दुनो** | दोघांत |
| **नानी** | लहान |
| **फोकाहार** | डामडौलाने |
| **मनुख** | माणूस |
| **सकलून** | एकत्र |
| **होले** | पात्र |

कृ.२. वरील बोलीभाषेतील उताऱ्याच्या आधारे खालील कृती सोडवा.

अ.

**दिलेल्या उताऱ्यातील बोलीभाषेची माहिती**

- १. बोलीचा प्रकार
- २. बोली प्रचलित असलेले भाग
- ३. बोलीत या भाषांचे मिश्रण आढळते

उत्तर: १. हळबी बोली.

२. महाराष्ट्रातील चंद्रपूर, भंडारा व एलिचपूर आणि मध्य प्रदेशातील बस्तर, कांकेर व रायपूर.

३. हिंदी व उडिया.

ब.

**व्याकरणिक वैशिष्ट्ये**

- १. 'अ' वर्णाऐवजी व 'ऐ' वर्णाऐवजी येणारे वर्ण
- २. बोलीभाषेत दिसणारी हिंदीतील लकब
- ३. प्रमाणभाषेत अर्थ लिहा. मनुख: अंकाल:

उत्तर: १. 'अ' वर्णाऐवजी 'आ' व 'ऐ' वर्णाऐवजी 'उइ' येतात.

२. 'व' वर्णाचा 'ब' होणे.

३. मनुष्य : माणूस, अंकाल : दुष्काळ.

क्र.२. वरील उताऱ्याचे प्रमाणभाषेत भाषांतर करा.

उत्तर: **उधळ्या मुलांची गोष्ट**

कोणा माणसाचे दोघेजण मुलगे होते आणि त्या दोघांतला लहान मुलगा आपल्या बापाला बोलला, "बाबा, जितकी मिळकत माझ्या वाट्याला पडते आहे ती मला देऊन टाक." आणि त्या माणसाने आपली मिळकत आपल्या दोन मुलांना वाटून दिली. पुष्कळ दिवस गेले न गेले तोच लहान मुलगा आपल्या वाट्याची सगळी मालमत्ता एकत्र करून दुसऱ्या दूरच्या राज्यात गेला आणि तिथे डामडौलाने आपली मालमत्ता त्याने उडवून टाकली. आणि जेव्हा पैसा उडवून टाकला तेव्हा त्या राज्यात मोठा दुष्काळ पडला आणि खाण्यासाठी त्याला अडचण भासू लागली. तेव्हा त्या राज्याच्या एका गृहस्थाकडे तो गेला (तेव्हा) त्या गृहस्थाने त्याला आपल्या शेतात डुकरे चारायला पाठवला... डुकरांना खायला दिलेला कोंडासुद्धा खाऊन त्याने आपले पोट भरले असते; पण तोसुद्धा कोणीही त्याला दिला नाही. तेव्हा त्याला शुद्ध आली आणि तो म्हणाला, "माझ्या बापाचे कितीतरी नोकर आहेत आणि त्यांच्यासाठीसुद्धा पोटभर खायला आहे; पण मी इथे भुकेने मरतो आहे. मी उठीन आणि बापाजवळ जाईन आणि त्याला म्हणीन, 'बाबा, परमेश्वरासमक्ष आणि तुझ्यासमक्ष मी अपराध केला आहे. आता मी तुझा मुलगा म्हणवायला पात्र नाही. मला आपला नोकर म्हणून ठेव."

# ३. वऱ्हाडी बोली

वऱ्हाडी ही बोली मध्य बुलढाण्यापासून उत्तरेस तापी नदीपर्यंत व पूर्वेकडे एलिचपूर, बैतुल, छिंदवाडा, बालाघाट, भंडारा, चंद्रपूरचा वायव्य भाग, वणी, वाशीम जिल्हा या भागात बोलली जाते. 'अ' वर्णाचा 'आ' होणे, शब्दातील आद्य 'अ' वर्ण 'ए' वर्णात रूपांतरित होणे किंवा 'ओ' वर्णाचा 'व' वर्ण होणे अशा प्रक्रिया या बोलीत घडतात. महानुभवांच्या लीळाचरित्र, गोविंदप्रभुचरित्र या आद्य गद्य ग्रंथांतून या बोलीची रूपे दिसतात. यादृष्टीने बोलीचे प्राचीनत्व सांगता येते.

## वऱ्हाडी बोली नमुना

तर नानूआजा म्हणायचा, 'तुमी काई वाटून घेऊ नका. तुमचा तरी काय इलाज? जमानाच बदलला त्याले तुमी तरी कसं थोपवून धरचान? तसं आता माहं राह्यलयं काय म्हणा... जगलो आस्तो आजून दहा-बारा सालं. पण मरतो आता उपासमारीनं... पण तुमाले सांगतो हे हाब्रीड तुमचंबी, हाब्रीड करंल एक दिवस. आरे पीक व्हते म्हन्ता बदबद. पण त्यो नुस्ता

भपका. दिसायले देखावा. सम्दं उत्पन्न खर्चातच आटून जाते न तुमचं. दांडातलं पाणी दांडातच आटून जाते. वाफा कोल्डा फटांग. हे बर्कताचं आस्तं त पैसा जाते कुठी तुमचा? हायल्या कावून नाई बांधून राह्यले शेतकरी. ते त सोडाच. पण हे निकस खाऊ खाऊ तुमीबी निकस होऊन जासाल हाळू हाळू. जाणूनबुजून रसायन हे. आन् रसायन का तग धरते का लय दिवस? भुई गळण धावून मरंल एक दिवस. पोटी पिकायची ताकदच उरणार नाई तिच्यात. अन् मंग तुमचं कर्ज कशाच्या माथं फेडसाल तुमी? हाय हाय करचान नुस्ते. शाप लागलं तुमाले या भुईचा. आरे ती दिसायले निरजीव आसली तरी जीव आस्ते तिले. तवाच त पोटी पिकती ती. पण तिच्यावर आसा अत्येचार केल्यावर किती दिवस दम धरणार हाय ती?

**शब्दार्थ :**

| | |
|---|---|
| **करचान** | कराल |
| **कोल्हा** | कोरडा |
| **गळण धावून** | नापीक होऊन |
| **तुमाले** | तुम्हांला |
| **त्याले** | त्याला |
| **धरचान** | धराल |
| **निकस** | निकृष्ट |
| **फटांग** | फट्ट |
| **फेडसाल** | फेडाल |
| **बर्कतीचं** | बरकतीचं (समृद्धीचं) |
| **माहं** | माझं |
| **हाब्रीड** | हायब्रीड (संकरित) |
| **हायल्या** | हवेल्या |

कृ.३. वरील बोलीभाषेतील उताऱ्याच्या आधारे खालील कृती सोडवा.

अ.

**दिलेल्या उताऱ्यातील बोलीभाषेची माहिती**

- १. बोलीचा प्रकार
- २. येथे बोलली जाते
- ३. यावरून बोलीचे प्राचीनत्व सांगता येते

उत्तर: १. वऱ्हाडी बोली.

२. मध्य बुलढाण्यापासून उत्तरेस तापी नदीपर्यंत व पूर्वेकडे एलिचपूर, बैतुल, छिंदवाडा, बालाघाट, भंडारा, चंद्रपूरचा वायव्य भाग, वणी, वाशीम जिल्हा या भागांत.

३. महानुभावांच्या लीळाचरित्र, गोविंदप्रभुचरित्र या आद्य ग्रंथांमध्ये या बोलीची रूपे आढळतात.

ब.

**व्याकरणिक वैशिष्ट्ये**

- १. 'अ' आणि 'ओ' वर्णाचे रूपांतर
- २. शब्दातील आद्य 'अ' वर्णाचे रूपांतर
- ३. प्रमाणभाषेत अर्थ लिहा.
  हायल्या :
  कोल्डा :

उत्तर: १. 'अ' वर्णाचे 'आ' मध्ये रूपांतर होते.
'ओ' वर्णाचे 'व' वर्णामध्ये रूपांतर होते.

२. शब्दातील आद्य 'अ' वर्णाचे 'ए' वर्णात रूपांतर

३. हायल्या : हवेल्या, कोल्डा : कोरडा.

किंवा

**कृ.३. वरील उताऱ्याचे प्रमाणभाषेत भाषांतर करा.**

**उत्तर:** तर नानू आजोबा म्हणायचे, 'तुम्ही काही वाटून घेऊ नका. तुमचा तरी काय इलाज? जमानाच बदलला त्याला तुम्हीतरी कसे थोपवून धराल? तसे आता माझे राहिलेच काय म्हणा... जगलो असतो अजून दहा-बारा वर्षे; पण मरतो आता उपासमारीने... पण तुम्हाला सांगतो हे हायब्रीड (संकरित) तुमचं पण हायब्रीड (संकरित) करेल एक दिवस. अरे पीक होते म्हणता पुष्कळ; पण तो नुसता भपका. दिसायला देखावा. सगळे उत्पन्न खर्चातच संपून जाते ना तुमचे. दांडातले पाणी दांडातच आटून जाते. वाफा कोरडा फट्ट. हे समृद्धीचे असते, तर पैसा जातो कुठे तुमचा? हवेल्या का म्हणून बांधत नाहीयेत शेतकरी? ते तर सोडाच; पण हे निकृष्ट खाऊन खाऊन तुम्हीपण निकृष्ट व्हाल हळूहळू. जाणूनबुजून रसायन हे. आणि रसायन का तग धरते खूप दिवस? भुई नापीक होऊन मरेल एक दिवस. पोटी पिकायची ताकदच उरणार नाही तिच्यात आणि मग तुमचे कर्ज कशाच्या भरोशावर फेडाल तुम्ही? हाय हाय कराल नुसते. शाप लागेल तुम्हाला या जमिनीचा. 'अरे ती दिसायला निर्जीव असली, तरी जीव असतो तिला. तेव्हाच तर पोटी पिकते ती; पण तिच्यावर असा अत्याचार केल्यावर किती दिवस दम धरणार आहे ती?'

## ४. बंजारा बोली

बंजारा ही मराठीची एक वैशिष्ट्यपूर्ण बोली आहे. ही बोली महाराष्ट्राच्या विदर्भ प्रांतात मोठ्या भूप्रदेशात बोलली जाते. यवतमाळ, अकोला आणि वाशीम जिल्हा व अमरावती आणि बुलढाण्याच्या काही प्रदेशांमध्ये ही बोली बोलली जाते. या बोलीचे

सर्वांत प्रमुख वैशिष्ट्य म्हणजे या बोलीवरील हिंदी आणि गुजराती बोलींचा प्रभाव हे आहे. छेइ, छूं, छेणी, ई अशी गुजराती भाषेच्या प्रभावाने आलेली क्रियापदे या बोलीत दिसतात. शिवाय या बोलीची स्वतंत्र संपत्तीही दिसून येते.

## बंजारा बोलीचा नमुना

अरे बाप! सारी मरग चलोगी तरी पाणीरं ठिकाणों छेइ. काई वियं ये सालेम, गावडी-ढोरेन जंगलेम खड छेई. मनक्यानं पियेन पाणी छेई. सारी बंदारा, वावडी, खाळ्या सारी सुकागे. आबेलागू वावरेमईर ढिकाळासुद्धा फुटे कानी. छप्चॅरेर शिक्षनेर पिसार वियाणों मोल लाई छूं. पेण्णी बैय्यगी तो दोबार पेण्णीसारू पिसा कतेती लावूं. लारेर साल वावरम् काई पिको कोनी, करण बँकेर कर्ज भरो कोनी. बँकेरभी ये साल कर्ज दे वाळो छेणी. घरेम मोट्यारमाल छोरी छं. ओर वायार काळजी, कई खाया, काई पिया, घर कुकरणं चलाया आजी छप्चॅरेन शिकाया कुकरणं. सारी वातेर काळजी वाटरी छं. देखरे मेघराजा हामाप कृपा करं ई. तोन विनवनी छं.

**शब्दार्थ :**

| | |
|---|---|
| आजी | आणि |
| आबेलागू | आतापर्यंत |
| ओर | तिच्या |
| कतेती लावूं | कोठून आणू |
| करण | म्हणून |
| कुकरणं | कसे |
| कोनी | नाही |
| खड | गवत |
| खाळ्या | खाचरे |
| चलोगी | संपलेले |
| छं | आहे |
| छप्चॅरेर | मुलांचे |
| छेइ | नाही |
| ढिकाळा | ढेकळे |
| ढोरेन | जनावरे |
| तोन | आपणांस |
| दे वाळो छेणी | देणार नाही |
| पिसा | पैस |
| पेण्णी | पेरणी |

| | |
|---|---|
| **बंदारा** | तलाव |
| **बैय्यगी** | फुकट गेली |
| **मनक्यानं** | माणसाला |
| **मरग** | मृग |
| **मोटच्यारमाल** | तरुण |
| **लारेर** | मागच्या |
| **वाटरी** | वाटणे |
| **वातेर** | गोष्टीची |
| **वायार** | लग्नाची |
| **वावडी** | विहीर |
| **वावरेमईर** | वावरातील |
| **वियं** | होईल |
| **सालेम** | वर्षी |
| **सारू** | करिता |

**कृ.४. वरील बोलीभाषेतील उताऱ्याच्या आधारे खालील कृती सोडवा.**

**अ.**

**दिलेल्या उताऱ्यातील बोलीभाषेची माहिती**

- **१. बोलीचा प्रकार**
- **२. या प्रदेशांत बोलली जाते**
- **३. बोलीवर प्रभाव असलेल्या भाषा**
- **४. अधिकचे वैशिष्ट्य**

**उत्तरः** १. बंजारा बोली

२. महाराष्ट्राच्या विदर्भातील यवतमाळ, अकोला, वाशीम जिल्हा व अमरावती आणि बुलढाण्यातील काही प्रदेश.

३. हिंदी व गुजराती.

४. या बोलीची स्वतंत्र शब्दसंपत्ती आहे.

**ब.**

**व्याकरणिक वैशिष्ट्ये**

- **१. गुजरातीच्या प्रभावाने आलेली क्रियापदे**
- **२. प्रमाणभाषेत अर्थ लिहा.**
  **कतेती लावूं :**
  **छप्चॅरेर :**

**उत्तर:** १. छेइ, छूं, छेणी, ई

२. कतेती लावूं : कोठून आणू

छप्चॅरेर : मुलांचे

किंवा

**कृ.४. वरील उताऱ्याचे प्रमाणभाषेत भाषांतर करा.**

**उत्तर:** अरे बाप रे ! सारा मृग संपला, तरी पावसाचा पत्ता नाही. काय होईल या वर्षी. गाई-गुरांना जंगलात गवतही नाही. माणसाला प्यायला पाणी नाही. सगळी तलावं, विहिरी, खाचरे सुकून गेलीत. आतापर्यंत वावरातील ढेकळंही फुटली नाहीत. मुलांच्या शिक्षणाला पैसा खर्च केला आहे. पेरणी फुकट गेली, तर दुबार पेरणी करायला पैसा कोठून आणणार. मागच्या साली शेतात काहीच उत्पन्न मिळाले नाही, म्हणून बँकेचे कर्जही भरले नाही. त्यामुळे बँकसुद्धा या वर्षी कर्ज देणार नाही. घरात तरुण मुलगी आहे. तिच्या लग्नाची चिंता आहे. काय खायचं नि काय प्यायचं. घर कसे चालायचे आणि मुलांचे शिक्षण कसे होणार. सगळ्या गोष्टींची काळजी वाटते. पहा रे मेघराजा ! आमच्यावर कृपा कर, ही आपणांस विनंती आहे.